दिनांक ०१/०२/२०२५

# प्रेसनोट

**ठाणे – कल्याण डोंबिवली महानगरपालीका येथील लिपीक यांना लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी रंगेहात पकडले बाबत.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक | :- | ठाणे |
| तक्रारदार | :- | पुरुष, वय-५६ वर्षे |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :- | **श्री. प्रकाश काशिनाथ धिवर** लिपीक,बाजार व परवाना विभाग, कल्याण डोंबिवली महानगरपालीका,कल्याण,जि. ठाणे |
| मागितलेली लाचेची रक्कम | :- | २,००,०००/- रूपये |
| स्विकारली लाचेची रक्कम | :- | तडजोडीअंती १,५०,०००/- |
| थोडक्यात हकीकत | :- | यातील लोकसेवक यांनी, तक्रारदार यांचेकडे त्यांचा मटन विक्री व कटाईचा परवाना हस्तांतरीत करण्याचा अर्ज स्वीकृत करणेसाठी व परवाना हस्तांतरीत करणेसाठी मदत म्हणुन स्वत: व वरिष्ठांकरीता लाचेची मागणी करीत असल्याने यातील तक्रारदार यांनी लोकसेवक यांचेविरूध्द कारवाई करण्याकरिता ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे दिनांक २९/०१/२०२५ रोजी तक्रार दिलेली आहे.<br>नमुद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २९/०१/२०२५ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई मध्ये यातील लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचा मटन विक्री व कटाईचा परवाना हस्तांतरीत करण्याचा अर्ज स्वीकृत करणेसाठी व परवाना हस्तांतरीत करणेसाठी मदत म्हणुन स्वत: व वरिष्ठांकरीता तडजोडीअंती १,५०,०००/- रु लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.<br>त्याअनुषंगाने दिनांक ३१/०१/२०२५ रोजी आजमविण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना तक्रारदार यांचकडून १,५०,०००/- रु. लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आलेले असून, गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी** – १. मा. श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
२. मा. श्री. संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
३. मा. श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परीक्षेत्र यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता – लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ- acbmaharastra@mahapolice.gov.in
Email – spacbthane@ mahapolice.gov.in
ॲप्लीकेशन – acbmaharastra.net
टोल फ्रि नंबर- १०६४
दुरध्वनी कमांक – ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस्ॲप्स् कमांक – ९९३०९९७७००

(संतोष अंबिके)
पोलीस निरीक्षक,
अन्टी करप्शन ब्युरो, ठाणे